( सोबत " सन २०१६-१७ मधील ऊस गाळपाचा आढावा आणि सन २०१७-१८ मधील ऊस गाळप हंगामाचे धोरण ठरविण्यासाठी" मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली मा. मंत्री समितीची दि.२०.०९.२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त )

क्रमांक : - ससाका २०१७/प्र.क्र.२४९/२५-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
E-mail:- pramod.valanj@nic.in
दिनांक:-१०.१०.२०१७.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**(दि.शि. देसाई)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,
मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री, (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
अध्यक्ष / उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. साखर भवन, नरीमन पॉईन्ट,मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (कृषी),मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (अन्न व नागरी पुरवठा ), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
सचिव, (ला.क्षे.वि.), मंत्रालय, मुंबई.
प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या. साखर भवन, नरीमन पॉईन्ट,मुंबई.
२. यांना विनंती करण्यात येते की, साखर संघातील संबंधितांना आपल्या स्तरावरुन इतिवृत्ताची प्रत पाठवण्यात यावी.
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई.

साखर आयुक्त तथा मंत्री समिती आमंत्रक, साखर आयुक्तालय, साखर संकुल, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे.

२. बैठकीतील निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळवावे.

सर्व संबंधित जिल्हाधिकारी (द्वारा- साखर आयुक्त, पुणे)

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी**

कार्यासन अधिकारी (कार्यासन ३स/ २५स ), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

## मंत्री समिती बैठक

### मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली “सन २०१६-१७ ऊस गाळप हंगामाचा आढावा आणि सन २०१७-१८ गळीत हंगामाचे धोरण ठरविणे” साठी दि.२०/०९/२०१७ रोजी पार पडलेल्या मा.मंत्री समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

| विषय | मुद्दा | मा.मंत्री समितीचे निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणां / अधिकारी | अमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ च्या मा.मंत्री समितीचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | इतिवृत्त वाचून कायम केले आणि इतिवृत्ताप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. | साखर आयुक्त | कार्यवाही नाही. |
| २ | गाळप हंगाम सन २०१७-१८ सुरु करणे. | गाळप हंगाम सन २०१७-१८ सुरु करण्याच्या दिनांकाबाबत बैठकीत उपस्थितांच्या मतानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले. | | |
| | | १) गाळप हंगाम दि. ०१ नोव्हेंबर, २०१७ पासून सुरु करावा. | १. साखर आयुक्त | १. ७ दिवस |
| | | २) हंगाम २०१६-१७ मधील पूर्ण FRP अदा केलेल्या कारखान्यांनाच हंगाम २०१७-१८ करीता गाळप परवाना देण्यात यावा. | २. साखर आयुक्त | २. गाळप हंगाम २०१७-१८ |
| | | ३) ऊसाचे संपूर्ण गाळप होईपर्यंत गाळप परवाना देण्यात यावा. | ३. साखर आयुक्त | ३.गाळप हंगाम २०१७-१८ |
| | | ४) गाळप परवाना सर्व मंजुरी ऑनलाईन पध्दतीने देण्यात यावा. | ४. साखर आयुक्त | ४. गाळप हंगाम २०१७-१८ |
| | | ५) दि.१.११.२०१७ पूर्वी गाळप हंगाम सुरु करणाऱ्या कारखान्यांना प्रतिटन रु.५००/- प्रमाणे दंड आकारण्यात यावा. | ५. साखर आयुक्त | ५. गाळप हंगाम २०१७-१८ |
| ३ | बिगर हंगामातील खर्चासाठी अल्पमुदत | हंगाम २०१७-१८ करीता नक्त मुल्य उणे असणारे व ५० % पेक्षा जादा ऊस | साखर आयुक्त | गाळप हंगाम २०१७-१८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कर्जासाठी शासन थकहमी धोरणाबाबत. | उपलब्धता असणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांना शासकीय हमीची आवश्यकता आहे. याबाबत मागील हंगाम २०१६-१७ चे धोरण या हंगामासाठी देखील कायम ठेवावे. | | |
| ४ | ऊस बिलातील कपाती व ठेवी बाबत. | एफआरपी ची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना अदा केल्यानंतर खालीलप्रमाणे कपाती करण्यास मान्यता देण्यात आली.<br><br>➢ मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी - प्रति मे टन रु.४/- .<br>➢ वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट निधी साखर उत्पादन प्रति क्विंटल रु. १/-.<br>➢ महाराष्ट्र राज्य सह.साखर कारखाना संघ वर्गणी :-<br>१. उत्पादनातील कारखान्यांना रु.१/- प्रति क्विंटल.<br>२. भाडे/भागिदारी तत्वावरील कारखाने ७० पैसे प्रति क्विंटल.<br>३. अत्यल्प उत्पादन / अनुत्पादित कारखाने रु.१५०००/-<br>➢ कामगारांची देणी भागविण्यासाठी साखर विक्रीतून रु.५०/- प्रति क्विंटल कपात.<br>➢ शासन निर्णयास अधिन राहून भाग विकास निधी ऊसदराच्या कमाल ३% किंवा रु.५०/- यापैकी जी रक्कम कमी असेल | ➢ साखर आयुक्त<br><br>➢ साखर आयुक्त/ वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट.<br>➢ साखर आयुक्त/ महाराष्ट्र राज्य सह.साखर कारखाना संघ<br><br>➢ साखर आयुक्त / साखर कारखाने<br><br>➢ साखर आयुक्त / साखर कारखाने | ➢ गाळप हंगाम २०१७-१८<br><br>➢ गाळप हंगाम २०१७-१८<br><br>➢ गाळप हंगाम २०१७-१८<br><br>➢ गाळप हंगाम २०१७-१८<br><br>➢ गाळप हंगाम २०१७-१८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | तेवढ्या मर्यादेपर्यन्त कपात.<br><br>➢ साखर संकुल देखभाल व दुरूस्ती करीता प्रतिटन ५० पैसे/- प्रमाणे कपात.<br><br>वरीलप्रमाणे कपातीबाबत साखर आयुक्त, पुणे यांनी तपासून कार्यवाही करावी. | ➢ साखर आयुक्त / साखर कारखाने | ➢ गाळप हंगाम २०१७-१८ |
| ५ | गाळप हंगाम २०१७-१८ मध्ये साखर कारखाना स्तरावर कपात करावयाचा निधी. | एफआरपी ची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना अदा केल्यानंतर खालीलप्रमाणे ठेवी स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.<br>अ) नवीन प्रकल्पाकरीता वित्तीय संस्थांच्या कर्जाऐवजी नवीन ठेवी स्विकारणे.<br>➢ शेतकऱ्यांना द्यावयाच्या FRP मधून कोणतीही कपात करण्यात येणार नाही.<br>➢ संबंधित शेतकऱ्याची वैयक्तिक लेखी संमती घेणे आवश्यक.<br>➢ कपात केलेल्या ठेवीची स्वतंत्रपणे गुंतवणूक आवश्यक<br>➢ जुन्या ठेवी मुदतीत परत करणे आवश्यक<br>➢ ठेवीचे नियम तयार करावे<br>➢ सर्वसाधारण सभेची पूर्व मान्यता<br>➢ ठेवीदाराने मुदतपूर्व ठेवीची मागणी केल्यास परतफेड बंधनकारक | अ )साखर आयुक्त / साखर कारखाने | अ) गाळप हंगाम २०१७-१८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ब) नविन प्रकल्पाकरिता ऊस बिलातून यापूर्वी कपात केलेल्या ठेवीस मुदतवाढ देणे.<br>➤ ठेवीवर पूर्णत: व मुदतीत व्याज दिलेले असावे.<br>➤ ठेवीची मुदत प्रकल्प अहवालात दर्शविलेल्या मुदतीपेक्षा जास्त नसावी.<br>➤ मुदतवाढीकरिता सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक.<br>➤ मुदतवाढीसाठी साखर आयुक्तालयाची मान्यता आवश्यक.<br>वरीलप्रमाणे कपातीबाबत साखर आयुक्त, पुणे यांनी तपासून कार्यवाही करावी. | ब ) साखर आयुक्त / साखर कारखाने | ब) गाळप हंगाम २०१७-१८ |
| ६ | शासकीय येणेबाकीच्या वसूली बाबत | शासकीय भागभांडवल, कर्ज व हमीशुल्क वसूलीसाठी टॅगिंगद्वारे प्रतिपोते रु. २५ /- प्रमाणे धोरण हंगाम २०१७-१८ मध्ये सुरु ठेवणेबाबत निर्णय झाला. | साखर आयुक्त / साखर कारखाने | गाळप हंगाम २०१७-१८ |
| ७ | **मा.अध्यक्ष महोदय यांच्या मान्यतेने आयत्या वेळचे विषय** | | | |
| I | साखर संघ व विस्माच्या शिफारशीबाबत | | | |
| १ | ऊसाच्या उपपदार्थाबाबत धोरण | सहविज निर्मिती प्रकल्पाची उभारणी पूर्ण झालेल्या परंतु पॉवर पर्चेस अग्रिमेंट (PPA) न झालेल्या १० सहकारी साखर कारखान्यांची उत्पादीत विज खरेदी करण्यासाठी | साखर आयुक्त / अपर मुख्य सचिव ,सहकार विभाग / प्रधान सचिव उर्जा विभाग | ३ महिने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पूर्वीच्या निर्मिती उद्दिष्ठा मध्ये वाढ करण्याबाबत व पॉवर पर्चेस अग्रिमेंट (PPA) करण्यासाठीची कार्यवाही करण्याबाबत प्रधान सचिव (उर्जा) यांचे स्तरावरील गठीत समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल. | | |
| २ | ऊस पिकास ठिबक सिंचन योजना | कृषी विभागाच्या ऊस विकासासाठीच्या ठिबक सिंचन योजनेमध्ये साखर संघाने केलेल्या शिफारशी संदर्भात साखर संघ, कृषी विभाग व सहकार विभागाने एकत्रित बैठक घेवून कृषी विभागाने सुधारित शासन निर्णय निर्गमित करावा. | साखर आयुक्त / अपर मुख्य सचिव , सहकार विभाग / प्रधान सचिव कृषी विभाग | १५ दिवस |
| ३ | सहविज निर्मिती प्रकल्प राबविणा-या कारखान्यांना ऊस खरेदी कर रकमे इतके अनुदान देणेबाबत. | वित्त सचिव यांनी कारखान्यांवर GST च्या होणा-या परिणामाचा अभ्यास करुन अहवाल सादर करावा व त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. | साखर आयुक्त / अपर मुख्य सचिव ,सहकार विभाग / अपर मुख्य सचिव , वित्त विभाग | २ महिने |
| ४ | राज्यातून परराज्यात जाणा-या ऊसावर बंदी घालणेबाबत. | हंगाम २०१७-१८ करीता राज्यातून परराज्यात जाणा-या ऊसावर बंदी घालण्यात यावी. | साखर आयुक्त / अपर मुख्य सचिव ,सहकार विभाग | १५ दिवस |
| ५ | स्वनिर्मित विज वापरासाठी कारखान्यांना रु.१.२० प्रति युनिट आकार द्यावा लागतो. ही आकारणी रद्द करण्यात यावी. | याबाबत ऊर्जा विभागाशी चर्चा करुन अंतिम निर्णय घेण्यात येईल. | साखर आयुक्त / अपर मुख्य सचिव ,सहकार विभाग / प्रधान सचिव उर्जा विभाग | ३ महिने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | ऊस किमतीवर आयकर आकारणी संदर्भात आयकर कायद्यात दुरुस्तीबाबत. | याबाबत आवश्यक ती माहिती साखर संघाकडून घेवून कायद्यात दुरुस्ती करणेबाबत केंद्र शासनास शिफारस करावी. | साखर आयुक्त / साखर संघ / अपर मुख्य सचिव ,सहकार विभाग | १५ दिवस |
| ७ | हंगाम २००६-२००७ व २००७-०८ मधील प्रलंबित साखर अनुदानाबाबत. | केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. | साखर आयुक्त / अपर मुख्य सचिव ,सहकार विभाग | १५ दिवस |
| ८ | सेफासू लोन २०१४ व सॉफ्ट लोन २०१५ चे पुनर्गठण करण्यात केंद्रास शिफारस करावी | साखर कारखान्यांना देण्यात आलेल्या सेफासू व सॉफ्ट लोनची पूर्नरचना करण्याबाबत केंद्र शासनाचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. | कार्यवाही नाही. | निरंक |
| ९. | ऊस उत्पादकांची नोंदणी ऑनलाईन करणेबाबत | कृषी विभागाने राज्यातील ऊस उत्पादकांची नोंदणी ऑन लाईन करण्याची कार्यवाही करावी. | साखर आयुक्त / अपर मुख्य सचिव , सहकार विभाग / प्रधान सचिव कृषी विभाग | ३ महिने |

*****************************************************